# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 19(3) अन्वये अपील क्रमांक 1172/2007.

श्री.रमेशकुमार व्यंकटस्वामी पोन्ना (मुदिराज),
रा. विवेकानंद कॉलनी, मकान नं. 5 बी,
पो. श्रीरामपूर, ता.पुसद,
जिल्हा यवतमाळ – 445 215. ..... **अपीलकर्ता**

**विरूध्द**

श्री. प्र. कर्वे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपसंचालक (संशोधन)
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
ता. जि. अमरावती.

कु. पि.डी. बोंद्रे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपसंचालक (संशोधन)
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
ता. जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.10.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 19(3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक 5.3.2008 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 21.3.2005 रोजी (परंतु सुनावणीच्या खुलाश्यामध्ये दिनांक 21.3.2006 असे अपीलकर्ता यांनी सांगितले) शासकीय माहिती अधिकारी श्रीमती आर. एच. परतेकी, कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांना माहिती मागितलेली दिसून येते. माहिती खालील प्रमाणे आहे. 1) मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमुर्ती दलवीर

भंडारी आणि न्या.एन.एच.पाटील यांनी समीतीकडे दाखल झालेल्या दाव्याचा निर्णय दोन महिन्यातच घ्यावा असे खंडपीठाने दिलेल्या आदेशाची व खंडपीठाने या संदर्भात समितीच्या वकीलांकडून माहिती मागवून घेतली त्यानुसार न्यायालयाला अमरावतीला 859 प्रकरणे प्रलंबित असल्याचे प्रकरणाच्या सत्यप्रमाणित प्रती पाहिजे. 2) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीवर न्यायाधिश नियुक्त करण्याचा घेतलेला निर्णय दिनांक 11 जानेवारी, 2005 रोजीच्या शासन निर्णयाची सत्य प्रमाणित प्रती पाहिजे. 3) शासन आदिवासी विकास विभाग, परिपत्रक क्र.एस.टी.सी./1000/पत्र क्र./151/का–10, दिनांक 28 नोव्हेंबर, 2001 चे सत्यप्रतिलिपीची प्रत पाहिजे. 4) आपले कार्यालयात दिनांक 29.4.2002 रोजी विभाग नियंत्रक, म.राज्य मार्ग परिमहामंडळ, भंडारा नोकरी (सेवा) विषय प्रकरणांचे माझे नांवे नियम 12(7) व 12(9) अ नमुना ''ग'' चे सत्य प्रमाणित साक्षाकिंत मुळ प्रतींची आवश्यकता आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे आपले कार्यालयीन प्रलंबित प्रकरणाचे मागितलेले अहवाल त्यानुसार आपले कार्यालयाचे समितीचे वकीलामार्फत अमरावती तपासणी समितीचे एकूण 859 प्रलंबित प्रकरणासह खंडपिठाने समितीकडे दाखल झालेल्या दाव्याचा निर्णय यापुढे दोन महिन्यातच द्यावा तसेच समिती संदर्भात समितीचे अध्यक्ष निवृत्त न्यायाधिशांच्या नेमणूकी संदर्भात शासन निर्णय व माझे जातीचा दाखला प्रलंबित असलेल्या दिनांक 29.4.2002 ते आजपर्यंतचा विषय. सदरची माहिती नोंदणीकृत पंजीबध्द टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक 10.4.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी (प्रि.दि. बोंद्रे) यांनी आपला उपरोक्त संदर्भीय अर्ज या कार्यालयास दिनांक 24.3.2006 रोजी प्राप्त झाला. सदर अर्जामध्ये आपण अतिशय लहान अक्षरामध्ये माहितीची मागणी केलेली आहे. वाक्यरचनाही स्पष्ट नसल्यामुळे आपणास हव्या असलेल्या माहितीचा नेमका बोध होत नाही. करिता आपणास विनंती करण्यात येते की, एकतर आपण स्वतः येवून आपणास हव्या असलेल्या माहितीचे स्वरूप स्पष्ट करावे किंवा स्पष्ट व मुद्येनिहाय

माहितीची लेखी मागणी करावी. जेणेकरून आपल्या अर्जावर उचित निर्णय देता येईल. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक 19.6.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले असून प्रथम अपीलाचे सुनावणीकरिता अपीलकर्ता यांना दिनांक 16.8.2006 रोजी सकाळी 12.00 वाजता उपस्थित राहण्यासाठी दिनांक 2.8.2006 रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसते. परंतु अपीलकर्ता हे प्रथम अपीलाचे सुनावणीस हजर राहिले नाहीत व त्यामुळे अर्जदारास कोणतीही माहिती नाकारली नाही किंवा माहिती पुरविण्यामध्ये जाणूनबुजून कोणतीही टाळाटाळ केलेली नाही. अपीलकर्ताचा अर्ज मिळाल्यानंतर अर्जात व अर्जावरून मागितलेल्या माहितीचे बाबत हेतू निश्चित कळवून मागितलेल्या माहितीचे स्वरूप स्पष्ट करण्यास सांगितले. अर्जात अर्जदाराने काढलेले आदेश पारित केला नव्हता, माहिती देण्याची नाकारली नव्हती म्हणून सदर पत्रामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांना तपशील दिलेला नव्हता. शिवाय अर्ज पाठविला नव्हता. शिवाय माहिती देण्याची टाळाटाळ केली नसतांना अर्जदाराने अपील केले आहे जे हया कायद्यानुसार नाही असा खुलासा केलेला दिसून येतो व त्यानंतर सुध्दा अपीलकर्ता यांनी शासनाकडे अपील केलेले दिसून येते व त्या अपीलाचे उत्तर स. नु. गावीत, उपसचिव यांनी दिनांक 9 मे, 2006 रोजी दिलेले असून अमरावती येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयात जे अपील अधिकारी आहेत त्यांचेकडे अपील करावे असे पत्र दाखल केलेले दिसून येते व तरीसुध्दा दिनांक 20.10.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपील मेमोमध्ये वरील अर्जात मागितलेली माहिती दिलेली आहे व त्यामध्येही संपूर्ण इतर माहिती मागितलेली आहे त्याच बरोबर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जिल्हा भंडारा, विभाग नियंत्रक (डी.सी.) इनका लेटर क्रमांक राप/विनि/भं/आस्था/ई–50/12362 के तारीख 15 मार्च, 2002 को डिपार्टमेंट द्वारा

दाखील किये गये अपीलार्थी के कास्ट सर्टिफिकेट स्क्रुटीनी किया गया आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र के जी.आर.नियम 12(7) और 12(9) अ नमुना 'ग' सर्टिफिकेट ऑफ वॅलीडिटी का गर्व्हनमेंट रेकगनाईझ का मुल प्रत चाहिए. अशी माहिती मागितलेली दिसून येते. यावरून अपीलकर्ता यांनी सुध्दा अनुसूचित जनजाती कास्ट सर्टीफिकेट स्क्रुटीनी कमेटी मध्ये निर्णय होवून वॅलिडीटी सर्टिफिकेट मिळावी त्याकरिता त्यांनी इतरही माहिती मागितलेली दिसून येते.

4. वास्तविक अपीलकर्ता यांनी दिनांक 10.4.2006 रोजी पाठविलेल्या पत्राप्रमाणे त्यांनी खुलासा केला असता तर कदाचित त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असती. परंतु अपीलकर्ता यांनी खुलासा केलेला नाही. प्रथम अपीलात सुध्दा सुनावणीस हजर राहिले नाही व प्रथम अपीलात सुध्दा माहितीच्या अर्जाचे संदर्भात कोणताही निर्णय नसतांना केलेला असल्यामुळे दाखल करण्याची आवश्यकता नव्हती तरी दाखल केलेले आहे. द्वितीय अपील सुध्दा प्रथम अपीलाचे निर्णया विरूध्द दाखल करावयाचे असते त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय नसतांना द्वितीय अपील दाखल केलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी स्वतः अनुसूचित जमाती प्रमाणपत्र मिळण्याकरिता व त्याकरिता इतर माहिती मागितलेली असल्यामुळे सदरची माहिती ही सार्वजनिक हिताकरिता न मागता स्वहिताकरिता मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 2 प्रमाणे ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या दोन संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात जी साहित्य स्वरूपात माहिती उपलब्ध आहे. उदा. अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई–मेल, अभिप्राय, सुचना इत्यादी यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करून घेणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट आहे. कोणत्याही प्रकारच्या निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात अंतिम निर्णय मिळवून घेणे हे अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे नाही व राज्य माहिती आयोगास सुध्दा तशा प्रकारचे आदेश देणे अधिकार कक्षे

बाहेर आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे सकृतदर्शनी सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

5. अपीलकर्ता यांनी लेखी युक्तीवाद सुध्दा सादर केलेला आहे. त्या लेखी युक्तीवादामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेले पत्र केवळ चुकीचे, उडवाउडवीचे व दिशाभूल करणारे, तसेच वेळकाढू धोरण, निष्क्रीय कार्यप्रणालीच्या धोरणाचे पत्र पाठविले असे म्हटले आहे. परंतु प्रत्यक्षात त्यांच्या अर्जातील माहितीचे वाचन करणे हे आयोगास सुध्दा शक्य नाही व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी खुलासा मागितल्यास त्याबद्यल त्यांना दोषी धरता येणार नाही. त्यामुळे प्रथम अपील किंवा द्वितीय अपील ही प्रक्रिया सुध्दा निरर्थक ठरते व मुळातच वॅलिडीटी सर्टिफिकेट हे माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कोणत्याही तरतुदी प्रमाणे निर्णय होवून उपलब्ध करून देता येत नाही. त्याकरिता स्वतंत्र अशी कार्यपध्दती आहे. ती सक्षम अधिकारी यांना असलेल्या अधिकारातच उपलब्ध करून देवू शकते. राज्य माहिती आयोगाचे कोणत्याही प्रकारे निर्णय प्रक्रियेचा संदर्भात आदेश देता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपीलातील वॅलिडीटी सर्टिफिकेटची अंतिम कारवाईची मागणी ही मान्य करण्यात येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांना अर्जात मागितलेली माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नसल्यामुळे व प्रथम अपीलाचे सुनावणी सुध्दा उपस्थित राहिले नसल्यामुळे व द्वितीय अपीलात सुध्दा त्यांची वॅलिडिटी सर्टिफिकेट मिळण्याची मागणी ही मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर.

दिनांक 4.3.2008

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**